# मेंदूच्या आवरणाचा दाह (Meningitis)




मेंदू व मज्जारज्जूला संरक्षण प्रदान करणा-या आवरणास सूज येणे म्हणजे मेनिनजायटिस होय.
आवरणास येणारी सूज ही मेंदू व मज्जारज्जू सभोवती असणा-या द्रव पदार्थाच्या संसर्गामुळे होते.
मेनिनजायटिस विशेषतः जीवाणू व विषाणू यांच्या संसंर्गामुळे होते परंतू काही अंशी एखादी शारीरीक दुखापत कर्करोग किंवा काही औषधे देखिल कारणीभूत ठरु शकतात. योग्य उपचाराकरीता मेनिनजायटिस होण्यामागचे कारण माहित करुन घेणे गरजेचे आहे.

## जीवाणू संसर्गित मेनिनजायटिस

**जीवाणू संसर्गित मेनिन जायटिस म्हणजे काय?**

मेंदू व मज्जारज्जू सभोवती असणा-या द्रवामार्फत जीवाणूंचा संसर्ग झाल्यास मेंदू व मज्जारज्जूच्या संरक्षण आवरणास सूज येणे म्हणजे जीवाणू संसंर्गित मेनिनजायटिस होय. हा संसर्ग प्राणघातक ठरु शकतो.

**जीवाणू संसर्गित मेनिनजायटिसचा धोका कशामुळे वाढतो?**

- संसर्गित व्यक्ती खोकल्याने व शिंकल्याने तसेच त्यांचे उष्टे अन्न खाल्याने नाक, तोंड व घसा यामार्फत जीवाणूंचा शरीरात प्रवेश होतो.
- डोक्यावर आघात झाल्यास या जीवाणूंचा शिरकाव जखमेमधून होऊ शकतो.
- मेनिनजायटिसचा धोका तीव्र असतो जेंव्हा व्यक्ती 60 वर्षे वयापेक्षा अधिक किंवा 15-24 वर्षे या वयोगटात असतात.
- मधुमेह , कर्करोग , अवयव प्रत्यारोपण यात देखिल हा धोका वाढू शकतो.

**लक्षणे-**

- तीव्र डोकेदुखी, मान अवघडणेव ताप
- शरीरावर चटट्े उठणे
- मान दुखी
- उल्टी व मळमळ
- तीव्र प्रकाशाकडे पाहता डोळे तीव्र दुखणे
- वारंवार झोप येणे व संभ्रमावस्था

**निदान व चाचणी-**

- रक्त तपासणी
- मेंदू व मज्जारज्जू च्या सभोवती असलेल्या द्रवाची तपासणी
- CT स्कॅन, MRI
- घशातील लाळेमधील जंतूची कृत्रिम वाढ

**उपचार-**

- प्रतिजैविकांचा वापर (अँन्टीबायोटिक्स)
- स्टेरॉइडस्
- अॅसिटामिनोफेन
- नॉन स्टरॉइडल अॅन्टी इनफ्लेमेंटरी ड्रग्ज

**प्रतिबंधात्मक काळजी-**

- नेहमी हात स्वच्छ धुवावे
- लस टोचून घेणे

**संदर्भ- मायक्रोमेडेक्स सोल्यूशन्स**